ARTHA — Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ,
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ — पुणें, बुधवार तारीख ४ सप्टेंबर, १९५७ — अंक ३६

## विविध माहिती

**गौतम बुद्धावरील चित्रपट**— सीलोनच्या सांस्कृतिक मंत्र्यांनीं अशी शिफारस केली आहे, कीं विमल रॉय ह्यांनीं तयार केलेला बुद्धाच्या जीवनावरील चित्रपट धंदेवाईक सिनेमागृहांतून दाखविला जाऊं नये. ह्या सिनेमागृहांतून गुन्हेगारीवरील व इतर रद्दी चित्रपट दाखविले जात असल्यामुळें बुद्धाचा चित्रपट खुल्या मैदानांत व शाळासारख्या ठिकाणीं दाखविण्यांत यावा असें त्यांचें म्हणणें आहे.

**रेल्वेसाठी आणखी कर्ज**—भारतामधील रेल्वेचा पंचवार्षिक कार्यक्रम पार पाडण्यासाठी जागतिक बँकेकडून आणखी कर्ज मिळण्याची शक्यता रेल्वेचे फिनॅन्शिअल कमिशनर श्री. दयाळ ह्यांनीं ध्वनित केली आहे. दुसऱ्या कार्यक्रमांत विजेवर चालणाऱ्या रेल्वेमार्गासाठी जरूर ते करार त्यांनीं फ्रान्समधील कारखान्यांशीं केली आहेत.

**अफगाणिस्तानला लष्करी मदत**—लष्करी साहित्य विकत घेण्यासाठी रशिआनें अफगाणिस्तानला ५ कोटी डॉलर्सचें कर्ज दिल्याची वार्ता आहे. मदतीमुळें अफगाणिस्तानच्या लष्करांत वाढ होणार नाहीं; पण तें आधुनिक लष्करी सामुग्रीनें सुसज्ज करण्यांत येईल. पाकिस्तान व इराण ह्यांना मिळालेल्या अमेरिकन लष्करी साहित्याची ही प्रतिक्रिया आहे असें म्हणतात.

**पाकिस्तानांत दारूबंदी**—पाकिस्तान सरकारनें कराचींत संपूर्ण दारूबंदी करण्याचें ठरविलें आहे. दारूबंदी हा विषय राज्य सरकारांच्या कक्षेत आहे. पण कराची हें राजधानीचें शहर असल्यामुळें त्या शहरापुरता निर्णय मध्यवर्ती सरकारनें घेतला आहे. परवानेदार व परकीय राजकीय प्रतिनिधी ह्यांना मात्र अपवाद करण्यांत येईल.

**रेल्वेमार्गांची खरेदी**—मद्रास राज्यांत तंजावर जिल्ह्यांत १३१ मैल लांबीचा रेल्वेमार्ग जिल्हा लोकलबोर्डाच्या मालकीचा आहे. सालेम जिल्हाबोर्डाच्या मालकीचाहि ३·८ मैल लांबीचा मार्ग आहे. हे दोन्ही रेल्वेमार्ग मध्यवर्ती सरकारनें विकत घ्यावयाचें ठरविलें आहे. भारतांत लोकलबोर्डाच्या मालकीचें हे दोनच रेल्वेमार्ग असावेत.

**पंचमहाल जिल्ह्यांतील खनिजें**—मुंबई राज्यांतील पंचमहाल जिल्ह्यांतील खनिज संपत्तीचा शोध लावण्यासाठीं मुंबई सरकारनें भूस्तरशास्त्रज्ञांची एक समिति त्या भागांत पाठविण्याचें ठरविलें आहे. ह्या भागांत कोणत्या खाणी निघूं शकतील तें अजमाविण्याचा सरकारचा उद्देश आहे. त्याचप्रमाणें गोध्रा शहरापासून १० मैलांवर असलेल्या उष्णोदकाच्या झऱ्यांचा विकास करण्याचेंहि घाटत आहे.

**गोहिलवाड जिल्ह्यांत सिमेंटचा कारखाना**—सौराष्ट्रांतील गोहिलवाड जिल्ह्यांत सिमेंटचा कारखाना काढला जाण्याची शक्यता आहे. पूर्व आफ्रिकेंतील एका हिंदी उद्योगपतीच्या साह्यानें कारखाना काढण्यांत येणार आहे. पूर्वीच्या सौराष्ट्र नियोजन समितीनें पांच ठिकाणीं सिमेंटचे कारखाने काढण्यांत यावेत अशी शिफारस केली होती.

**तेलावर चालणारीं रेल्वे-एंजिनें**— रेल्वे स्टेशनमधील स्थानिक कामासाठी तेलावर चालणारीं १०० रेल्वे-एंजिनें विकत घ्यावयाचें रेल्वेबोर्डानें ठरविलें आहे. हीं एंजिनें वाफेवर चालणाऱ्या एंजिनांपेक्षा अधिक कार्यक्षम आणि खर्चाला कमी अशी असतात. लांबच्या प्रवासासाठी अशाच प्रकारचीं १०० एंजिनें अमेरिकेकडून मागविण्यांत आलीं आहेत.

**रशिआशीं व्यापार करण्याची तयारी**—पश्चिम जर्मनीचें सरकार येत्या तीन वर्षांत रशिआशीं २२·४ कोटी पौंड किंमतीचा व्यापार करण्यास तयार असल्याचें समजतें. रशिआनें वरील रकमेच्या दुप्पट रकमेचा व पांच वर्षांचा करार करण्याची सूचना केली होती. परंतु इतक्या लांब मुदतीचा करार करण्यास पश्चिम जर्मनीचें सरकार तयार झालें नाहीं.

**केरळांत मिळालेलें भूदान**—आचार्य विनोबा भावे ह्यांनीं भूदान मिळविण्यासाठी केरळ राज्यांत साडेचार महिन्यांचा दौरा काढला होता. त्यांना १,००० एकर जमीन दान म्हणून मिळाली. ३०१ संपूर्ण खेडींहि मिळालीं. ह्या खेड्यांतील कुटुंबांची संख्या ६,५०० आहे, आणि जमिनीचें क्षेत्र ४,५०० एकर आहे. आचार्यांना ५०,००० रुपये संपत्तिदान म्हणून मिळालें.

**सीलोन सरकारचा नवा कर**—सीलोनमधून बोटीनें अगर विमानानें बाहेर जाणाऱ्या प्रवाशांवर कर बसविण्याचा निर्णय सीलोन सरकारच्या वाहतूक खात्यानें घेतला आहे. विमानतळांची व बंदरांची सुधारणा करण्यासाठी नव्या कराचा उपक्रम करण्यांत येत आहे. दर प्रवाशामागें २॥ रुपये कर घेतल्यास सरकारला दरसाल १० लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळूं शकेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**संरक्षण मंत्र्यांना संततिनियमन नको**—भारताचे अविवाहित संरक्षणमंत्री श्रीकृष्ण मेनन मुंबई येथील वैद्यकीय विद्यार्थ्यांसमोर बोलतांना म्हणाले कीं, आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं कुटुंब-नियोजनाची कांस धरणें हा भ्रम आहे. लोकांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं उत्पादनांत सारखी वाढ करीत गेले पाहिजे. वैद्यकीय विद्यार्थ्यांना सामाजिक प्रश्नांचा अभ्यास करण्याचा सल्ला त्यांनीं दिला.

## जी. डी. सी. अँड ए. परीक्षेबाबत अडचणी आणि त्यांवर सुचविलेला उपाय

श्री. संपादक 'अर्थ' यांसी :—

स. न. वि. वि.

दि. २१–८–५७ च्या 'अर्था' तील श्री. बा. गो. महाजनी यांचें पत्र वाचलें. त्यांनीं उपस्थित केलेले मुद्दे व सूचना यांचा विचार होणें आवश्यक आहे. 'जी. डी. सी. ॲण्ड ए.' व 'एच. डी. सी.' यांचा अभ्यासक्रम, पहिल्या परीक्षेंतील ॲड्व्हान्स अकौंटन्सी सोडल्यास, बहुतांशीं सारखाच आहे. तेव्हां एच. डी. सी. परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना बाकीच्या विषयांत एक्झमशन देऊन फक्त अकौंटन्सीच्या पेपरला बसवावें व त्यांत उत्तीर्ण झालेल्यांना 'जी. डी. सी. ॲण्ड ए.' हा डिप्लोमा द्यावा. पुण्याच्या को–ऑप. ट्रेनिंग कॉलेजमधील एच. डी. सी. च्या अभ्यासक्रमासाठी रिझर्व्ह बँक खर्च करते. या कोर्ससाठी पाठविण्यांत येणारे कांहीं सरकारी नोकर 'जी. डी. सी. ॲण्ड ए.' असतात. त्यांना पुन्हां वर्षभर पगारी रजेवर पाठवून 'एच. डी. सी.' उत्तीर्ण करावयास लावणें म्हणजे सरकारी पैशाचा अनावश्यक व्यय आहे. तेव्हां 'जी. डी. सी. ॲण्ड ए.' झालेल्यांना पुन्हां 'एच. डी. सी.' साठी पाठवूं नये. ही एक बाब, व दुसरी म्हणजे पुण्याच्या को. ऑप. कॉलेजच्या 'एच. डी. सी.' डिप्लोमास 'जी. डी. सी. ॲण्ड ए.' चे बरोबरीनें मान्यता द्यावी. ही दुसरी बाब. चालू सालपासून 'जी. डी. सी. ॲण्ड ए.' च्या अभ्यासक्रमांत बरेच फेरफार करण्यांत आल्यामुळें 'एच. डी. सी.' झालेल्यांना फक्त 'अकौंटन्सी' च्या पेपरला बसूं द्यावें व त्यांत उत्तीर्ण झालेल्यांना 'जी. डी. सी. ॲण्ड ए.' हा डिप्लोमा द्यावा. या बाबतींत संबंधित सरकारी अधिकाऱ्यांनीं व सहकारी क्षेत्रांतील जबाबदार व्यक्तींनीं विचार केल्यास ठीक पडेल. कळावे.

आपला,

C/o नगर डि. अ. सें. को. बँक. लि. अहमदनगर. — ल. का. कुलकर्णी बी. ए., एच. डी. सी.

## पगार थकलेल्या नोकरांचेकडून निष्ठेनें काम कसें होणार ?

मध्यप्रदेशाचे उप–अर्थमंत्री, श्री. एम्. पी. दुबे ह्यांनीं कबूल केलें, कीं राज्य सरकारच्या सुमारें ७,००० नोकरांना गेल्या कित्येक महिन्यांचा पगार अद्याप मिळालेला नाहीं ! कित्येक तांत्रिक अडचणींमुळें असें घडलें आणि सुमारें ६ हजार नोकरांचा हा थकलेला पगार देण्याचा हुकूम आतां काढण्यांत आला आहे; उरलेल्या हजार नोकरांच्या पगाराबाबतहि सत्वर हुकूम काढण्यांत येईल, असें श्री. दुबे ह्यांनीं सांगितलें. स्वतःच्या नोकरांचा पगार थकविणाऱ्या सरकारवर बाकीच्यांनीं किती अवलंबून रहावें, असा प्रश्न येथें सहाजीकच निर्माण होतो. त्याचप्रमाणें, स्वतःचा पगार थकलेला असतांना, नोकर लोक तरी आपलें काम किती निष्ठेनें व कार्यक्षमतेनें करणार, ह्याची कल्पनाच केलेली बरी. नोकरांचा पगार वक्तशीर न देण्यास कोणतींहि तांत्रिक कारणें असोत; तीं पगाराच्या तारखेचे आधींच दूर व्हायला हवींत. स्वतःच्या नोकरांकडून व जनतेकडून हार्दिक साहाय्याची अपेक्षा बाळगणाऱ्या सरकारनें स्वतःच आपली वृत्ति व कृति आधीं सुधारली पाहिजे आणि कार्यक्षमता वाढविली पाहिजे, हें स्पष्ट आहे.

## किरणोत्सर्गी धूलीकणांचा धोका

पाश्चात्य राष्ट्रें आणि रशिआ ह्यांच्यामध्यें शस्त्रास्त्रांवर मर्यादा घालण्यासंबंधीं ज्या वाटाघाटी चालू आहेत, त्या फलद्रूप होण्याचीं चिन्हें अजूनहि दिसत नाहींत. दरम्यान अमेरिका व रशिआ ह्यांनीं अणुशक्तीचा वापर करणाऱ्या घातक हत्यारांची चांचणी चालूच ठेवली आहे. अण्वस्त्रांच्या स्फोटामुळें मनुष्याच्या अस्तित्वाला धोका पोंचत असल्याचा इषारा अनेक शास्त्रज्ञांनीं वारंवार दिला आहे. आतां अमेरिकेंतील कांहीं शास्त्रज्ञांनीं स्फोटांचा वाईट परिणाम १९७० च्या सुमारास विशेषत्वानें दिसून येण्याची शक्यता स्पष्ट केली आहे. ह्या शास्त्रज्ञांनीं अशी माहिती जाहीर केली आहे कीं, अण्वस्त्रांच्या स्फोटामुळें पृथ्वीवर दरसाल १ कोटी टन दूषित धूलीकणांचा परिणाम होत आहे. ह्याच गतीनें पृथ्वीवरील वातावरण दूषित होत राहिल्यास १९७० सालच्या सुमारास मनुष्याच्या आरोग्याला घातक अशी परिस्थिति निर्माण होईल. तथापि, हा हिशोब अगदीं बिनचूक आहे असें मात्र नाहीं. जगाच्या कांहीं भागांत मानवी आयुष्याला आजहि धोका उत्पन्न झाला असण्याचा संभव आहे. अण्वस्त्रांचा स्फोट करण्यांत आला म्हणजे 'स्ट्रॉन्टिअम' नांवाचें एक विषारी द्रव्य हवेच्या अगदीं वरच्या थरांत प्रवेश करते. ह्या द्रव्याचा विषारीपणा दर २८ा वर्षांनीं निम्मा कमी होतो. पण हवेच्या वरील थरांतून हा विखार हळूहळू भूमीवर पडतो. जमिनीवर उगवणाऱ्या वनस्पतींत ते बेमालूमपणें घर करते आणि मांस अगर वनस्पतीच्या भक्षणाच्या द्वारें मनुष्याच्या शरीरांत ठाण मांडतें. एकदां शरीरांत घुसल्यावर तें हाडांत सांचत जातें व कॅन्सरचा विकार उत्पन्न करते. प्रयोगशाळेंतील प्राण्यांत ह्या दोषामुळें हाडांचा कॅन्सर झाल्याचें सिद्ध झालेलें आहे. तथापि मनुष्याच्या शरीरावर त्याचा असाच परिणाम होईल असें सिद्ध झालेलें नाहीं.

## रोख्यांची रक्कम गांवकऱ्यांच्या घरींच मिळणार

छोट्या बचतीसाठी वाढत्या प्रमाणांत सोयी उपलब्ध करून देण्याच्या योजनेचा एक भाग म्हणून राष्ट्रीय रोखे आणि इतर पोस्टल सर्टिफिकिटें यांच्या रकमा खेड्यांतील पोस्टमनमार्फत देण्याची पद्धत पोस्ट आणि तार खात्यानें सुरू केली आहे. यामुळें खेड्यांतील लोकांना रोख्याचे पैसे आतां त्यांच्या घरींच मिळण्याची सोय झाली आहे. आजवर खेड्यांतील लोकांना सेव्हिंग्ज बँकेचे व्यवहार करणाऱ्या नजिकच्या पोस्टकचेरींत जाऊन रोख्यांचे पैसे घेण्यासाठी अर्ज करावा लागे व ती रक्कम आणण्यासाठी त्यांस परत एकदां हेलपाटा घालावा लागे. त्याचप्रमाणें दरवेळीं त्याला ओळख पटविण्यासाठी पोस्टकचेरींत ओळख असलेली एखादी व्यक्ति बरोबर न्यावी लागे. परंतु या नव्या सोयीप्रमाणें सदर रोखे बाळगणाऱ्या लोकांना त्यांचे पैसे मिळण्यासाठी योग्य साक्षीसह अर्ज करून तो गांवच्या पोस्टमनकडे देतां येईल. मनीऑर्डरच्या कमिशनसाठी त्याच किंमतीचीं पोस्टांचीं तिकिटें सदर अर्जावर चिटकवून पाठवितां येतील. खेड्यांतील पोस्टमनचें व्हिजिट बुक तपासण्यासाठी त्या खेड्यांतील एखादा जबाबदार गांवकऱ्याची सही पोस्टामध्यें नोंदविलेली असेल त्याची ओळख म्हणून अर्जावरच येईल. यानंतर पोस्टकचेरींतून रक्कम घेऊन पोस्टमन त्याच्या पुढील फेरींत ती अर्जदारास देईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. ४ सप्टेंबर, १९५७



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अर्बन सहकारी बँकांचें भवितव्य

### रिझर्व्ह बँकेकडून तूर्त तरी मदतीची शक्यता नाहीं

"कर्जे देण्याच्या बाबतींत आम्हीं आतां व्यापारी बँकांवरील नियंत्रणें वाढवीत आहों. आपली परिस्थिति जरा बिकट झाली आहे. औद्योगिक उपक्रमांसाठी भांडवल तर पुरविलें पाहिजे आणि इकडे किंमती खाली येण्याचीं चिन्हें तर कांहीं दिसत नाहींत. नाणेंविषयक धोरणांत बदल करून सुधारणा करण्याच्या कामीं सरकारला आणि रिझर्व्ह बँकेला कितपत यश येतें, तें आतां लवकरच कळून येईल" असे उद्‌गार रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अयंगार ह्यांनीं मुंबई राज्य अर्बन बँकपरिषदेचें उद्‌घाटन करतेवेळीं गेल्या आठवड्यांत काढले.

स्टेट बँकेनें लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांना मदत करण्याचे कांहीं प्रयोग सुरू केले आहेत, त्याबद्दल श्री. अयंगार ह्यांनीं उत्साह दर्शविला नाहीं. ह्या उद्योगधंद्यांकडे लक्ष पुरविण्याचे कामीं स्टेट बँकेसारखी मोठी, इतर मोठ्या व्यापार-उद्योगांत गुंतलेली बँक विशेष कांहीं करूं शकणार नाहीं. स्टेट बँकेवर लवकरच आणखीहि नव्या जबाबदाऱ्या येऊन पडणार आहेत. अशा परिस्थितींत, अर्बन बँकांनींच लहान उद्योगधंद्यांकडे जास्त लक्ष पुरवावें, असें श्री. अयंगार ह्यांनीं सुचविलें. उद्योगधंद्यांत पैसे गुंतविण्यांतील धोका लक्षांत घेतला आणि बहुसंख्य अर्बन बँकांचा छोटा आकार विचारांत आणला म्हणजे त्यांना हें काम हातीं घेणें कसें अवघड आहे, ह्याची सहज कल्पना येईल. ह्याचा अर्थ एवढाच, कीं आजच्या बिकट परिस्थितींत, लहान उद्योग-धंद्यांच्या भांडवलाचा प्रश्न सुटण्याचे मार्गांतील अडचणी वाढतच चालल्या आहेत.

शहरी विभागांतील नागरिकांची स्थिति दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे; खेड्यांतील जनतेचे मानानें शहरांतील जनतेला वाईट दिवस येत चालले आहेत. अन्नाचा वाढता खर्च व रहायला जागा मिळण्याची पंचाईत, ह्यांनीं शहरी मनुष्य पिळून गेला आहे. ह्यांत सुधारणा झाली नाहीं, तर त्याचें जीवन अधिक दुःसह होईल. सहाजीकच, त्यामुळें होणारे आर्थिक व राजकीय परिणाम अर्बन बँकांना जाचक झाल्याविना रहाणार नाहींत. सहकारी क्षेत्रांतील कार्यकर्त्यांनीं श्री. अयंगार ह्यांच्या ह्या इशाऱ्याकडे लक्ष देणें अगत्याचें आहे.

व्याजाच्या वाढत्या दरांचे बाबतींत अधिक लक्ष घालून, त्यांचे संबंधांत सुसूत्रता घडवून आणण्याचें महत्त्व श्री. सरय्या ह्यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत प्रतिपादन केलें होतें. वाढत्या दरांच्या जाचकपणाबद्दल दुमत होण्याचें कारणच नाहीं; पण त्याविषयीं उपाययोजना मात्र सोपी नाहीं. जगांतील सर्व देश आतां आर्थिक दृष्टीनें इतके एकमेकाशीं बद्ध झालेले आहेत, कीं न्यूयॉर्कमधील एखाद्या घटनेचा जगामधील सर्व लोकांवर तात्काळ परिणाम घडून येऊं शकतो. न्यूयॉर्क किंवा लंडन येथील व्याजाचे दर वाढले, कीं आपल्या देशांत व्यवहार करणाऱ्या विदेशी एक्सचेंज बँका न्यूयॉर्क किंवा लंडन येथें पैसे न उभारता, भारतांत ते उभारणें पसंत करतात. त्यामुळें, येथील उपलब्ध पैशाला मागणी वाढून इथले व्याजाचे दरहि वाढतात. आर्थिक व औद्योगिक प्रगतीच्या योजनांसाठी अधिकाधिक पैसा हवा असतांनाच, ह्या प्रवृत्तीनें अडचणींत भर पडत आहे. त्याचा परिणाम, कॉलमनीचे दर भरमसाट वाढण्यांत झाला आहे. अशा परिस्थितींत व्याजाचे दर कमी पातळीवर स्थिरावण्याचा प्रयत्न करण्यास वावच राहिलेला नाहीं; उलट हे दर आणखी वाढण्याचाच रंग दिसतो. अर्बन बँकांना इतर बँकांप्रमाणेंच ह्या परिस्थितीला तोंड द्यावें लागणार आहे. अर्बन बँकांची तपशीलवार पहाणी करण्यासहि रिझर्व्ह बँकेला तूर्त फुरसत नाहीं. येते कांहीं महिने तरी, सरकार काय आणि रिझर्व्ह बँक काय, इतक्या अवघड परिस्थितींत सांपडली असल्याकारणानें आणि सरकार रिझर्व्ह बँकेच्या द्वारां आपले आर्थिक प्रश्न सोडवूं पहात असल्या कारणानें बँकिंगचे इतर प्रश्न मागें पडले तर त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें कांहीं नाहीं.

---

## संयुक्त-राष्ट्र-संघटनेकडून मिळणारें तांत्रिक साह्य

संयुक्त-राष्ट्र-संघटना राजकीय क्षेत्राखेरीज इतर क्षेत्रांतहि उपयुक्त कार्य करीत आहे. संघटनेच्या बिगर राजकीय क्षेत्रांतील कार्यांत मागासलेल्या राष्ट्रांना तांत्रिक साह्यानें देण्याच्या महत्त्वा-च्या कार्याचा समावेश होतो. तथापि, तांत्रिक साह्य देण्याच्या कामीं उपयोगी पडेल असा द्रव्यनिधि संघटनेजवळ अजूनहि अपुराच आहे. तांत्रिक साह्य देण्याचा विस्तृत कार्यक्रम आखून आठ वर्षें झालीं आहेत. संघटनेच्या द्रव्यनिधीला ८० देशांकडून वर्गणी येत असते. पण एकूण जमा होणाऱ्या निधीपैकीं सुमारें अर्धी रक्कम अमेरिकेकडून मिळत असते. संयुक्त-राष्ट्र-संघटने-कडून तांत्रिक साह्याबद्दलचा एक अहवाल तयार करण्यांत आला आहे. त्यांत असें सूचित करण्यांत आलें आहे कीं, तांत्रिक साह्याचा कार्यक्रम अधिक मोठ्या प्रमाणावर आधारणें जरूर आहे. ह्याचा अर्थ असा कीं, जे देश आज वर्गणी देत आहेत त्यांनीं आपल्या रकमेंत वाढ करणें जरूर झालें आहे. ह्या अहवालास अनुसरून भारत सरकारनें १९५८ सालीं आपल्या वर्गणींत वाढ करण्याचें ठरविलें आहे.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, १९५१ सालापासून भारत आपली वर्गणी वाढवत आला आहे. १९५१ सालीं भारतानें २ लाख ५० हजार डॉलर्स इतकी रक्कम दिली. १९५७ सालीं भारतानें दिलेल्या वर्गणीचा आंकडा ५ लाख डॉलर्सपर्यंत आला आहे. १९५८ सालीं वर्गणीचा आंकडा ह्याहीपेक्षा अधिक होईल. संयुक्त-राष्ट्रसंघटनेच्या तांत्रिक-साह्य-खात्याला भारतातर्फे अशी सूचना करण्यांत आली आहे कीं, खात्यानें बिगर-औद्योगिक योजनांना मदत करण्यापेक्षा औद्योगिक योजनांना साह्य करण्याकडे अधिक लक्ष द्यावें. १९५१ सालीं भारताला सुमारें १॥ लाख डॉलर्सचें साह्य करण्यांत आलें. पुढील चार वर्षांत ९ लाख ते १० लाख डॉलर्सची मदत करण्यांत आली. १९५८ सालीं भारताला

मिळणाऱ्या मदतींची रक्कम ऑक्टोबर–नोव्हेंबरमध्यें ठरविण्यांत येणार आहे. १९५६ सालीं २० लाख, ६८ हजार डॉलर्सची मदत तांत्रिक-साह्य-खात्याकडून मिळाली. १९५७ सालीं २० लाख, ३४ हजार डॉलर्सची मदत मिळाली. पण इतका मोठा आंकडा अपवादात्मक समजला पाहिजे. रशिआनें मुंबई येथें उच्च तांत्रिक शिक्षण देणारी संस्था काढण्यास मदत केली आणि ही मदत संयुक्त–राष्ट्र–संघटनेतर्फे दिली. म्हणून वरील दोन वर्षांत मिळालेल्या मदतीचा आंकडा फुगलेला दिसतो.

संयुक्त–राष्ट्र–संघटनेच्या तांत्रिक साह्यखात्यानें भारताला आतांपर्यंत ६१ तज्ज्ञांचा पुरवठा केलेला आहे. त्यापैकी ७ औद्योगिक विभागाकडे, ८ वहातूक आणि दळणवळणाकडे, आणि ३ इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनिअरिंगकडे पुरविण्यांत आले. बाकीचे तज्ज्ञ इतर क्षेत्रांत म्हणजे सार्वजनिक आरोग्य, समाज-हित–संवर्धन, आंकडे जमविणें, ह्यांत सामावले गेले. भारताला मिळणाऱ्या तांत्रिक साह्याचें स्वरूप साधारणपणें असें होतें. परंतु येत्या कांहीं वर्षांत उद्योगधंद्यांना लागणाऱ्या तांत्रिक मदतीवर अधिक जोर देण्यांत येणार असल्यानें मदतीच्या स्वरूपांत बदल घडवून आणणें अगत्याचें ठरणार आहे. त्या दृष्टीनें भारताच्या नागरिकांना औद्योगिक शिक्षण देण्याचा जो कार्यक्रम तांत्रिक साह्य–खात्यानें आंखला आहे तो महत्त्वाचा आहे. चालू वर्षाच्या मे महिन्यापर्यंत २७३ भारतीयांना औद्योगिक शिक्षण देण्यांत येत होतें. त्यापैकी ८० उमेदवार लोखंड व पोलादाच्या धंद्यांतील होते, ३० इतर उद्योगधंद्यांतील, १९ खनिज व इतर नैसर्गिक धातूंच्या उद्योगधंद्यांतील, २० वीजनिर्मिति व पाटबंधाऱ्यांकडील आणि १८ जमिनीवरील व पाण्यांतील वहातूक खात्याकडील होते. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मूलभूत स्वरूपाच्या उद्योगधंद्यांकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येणार असल्यानें तांत्रिक तज्ज्ञांचें महत्त्व अधिकच वाढतें आहे.

---

### भारतामधील बंदरांसाठी आधुनिक यंत्रसामुग्री

भारताचे अर्थमंत्रि श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं लोकसभेंत नुकताच असा खुलासा केला कीं, दुसरी पंचवार्षिक योजना अमलांत आणतांना जरी कांहीं फेरफार करावे लागले तरी योजनेच्या गाभ्यांत फरक करण्यांत येणार नाहीं. योजनेच्या गाभ्यांत त्यांनीं वहातुकीचा समावेश केला होता. भारतामधील वहातुकीचा प्रमुख भार रेल्वे उचलीत असली तरी परदेशांतील मालाची चढउतार मुंबई–कलकत्ता ह्यांसारख्या मोठ्या बंदरांतच होत असते. पंचवार्षिक योजनेसाठीं लागणाऱ्या अवजड साहित्याची चढउतार करण्याच्या कामाचा बोजाहि त्यांना उचलावा लागतो. पण बंदरांतील साधनें अपुरीं पडतात आणि मालानें भरलेल्या बोटींना ताटकळत रहावें लागतें. बंदरांची ह्या बाबतींतील कार्यक्षमता वाढविण्यासाठी भारत सरकारच्या वहातूक खात्यानें आपलें एक मंडळ युरोपांतील देशांचा दौरा करण्या-साठीं पाठविण्याचें ठरविलें आहे. युरोपांतील प्रमुख देशांतून बंदरांत वापरण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री ताबडतोब विकत घेण्याचा प्रयत्न वरील मंडळ करणार आहे. अशा प्रकारची विविध नमुन्यांची यंत्रसामुग्री पश्चिम युरोपांतील देशांत तयार असल्याची माहिती सरकारला कळली आहे. मामुली मार्गानें यंत्रसामुग्री विकत घ्यावयाची झाल्यास कालापव्यय फार होतो. तो टाळण्यासाठी मंडळ जागच्या जागीं सौदे पटविण्याचा प्रयत्न करील. भारत सरकारच्या अर्थखात्याला ही योजना पसंत असून तीसाठी लागणारी परदेशीय हुंडणावळ पुरविण्याची व्यवस्था करण्यास तें तयार आहे. यंत्रसामुग्रीची किंमत उशिरा देण्याच्या अटीवर सौदे करण्याची सरकारची इच्छा आहे. अशा प्रकारचे सौदे पटले, तर तीन ते सहा महिन्यांच्या आंत खरेदिलेली यंत्र-सामुग्री भारताची वाट चालू लागेल.

---

### युनायटेड नेशन्सच्या विरुद्ध ट्रायब्यूनलचा निवाडा

मद्रासचे उद्योग व कामगारमंत्रि, श्री. वेंकटरामन्, हे जिनी-व्हाला जाऊन नुकतेच परत आले. युनायटेड नेशन्सच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रायब्यूनलचे सभासद ह्या नात्यानें ते जिनी-व्हाला गेले होते. युनायटेड नेशन्स आणि त्याचे तिघे नोकर ह्यांचेमधील तंट्यांबाबत ट्रायब्यूनलनें निवाडा केला. ह्या तिघांपैकी श्री. जे. एफ. बलसारा ( माजी डेप्युटि म्युनिसिपल कमिशनर, मुंबई ) हे एक होते. युनायटेड नेशन्समध्यें त्यांनीं 'टेक्निकल असिस्टन्स एक्सपर्ट इन् दि फार ईस्ट' ही नेमणूक पत्करली. डिसेंबर, १९५५ मध्यें त्यांना नोकरीवरून कमी करण्यांत आलें. तेव्हां त्यांनीं युनायटेड नेशन्सच्या जॉइंट अपीलबोर्डाकडे दाद मागितली. श्री. बलसारा ह्यांना युनायटेड नेशन्सच्या मध्यवर्ती कचेरींत किंवा टेक्निकल असिस्टन्स ॲडमिनिस्ट्रेशनमध्यें त्यांच्या सेवानिवृत्तीच्या वयापर्यंत नोकरी देण्यांत यावी, अशी जॉइंट अपीलबोर्डानें शिफारस केली. त्याप्रमाणें त्यांना आतिपूर्वेकडील देशांत 'सोशल वेल्फेअर तज्ज्ञ' म्हणून नेमण्याची योजना झाली. फिलिफाइन्समध्यें त्यांना नोकरी मिळवून देण्याचा युनायटेड नेशन्सच्या मध्यवर्ती कचेरीनें प्रयत्न केला, पण त्यांत यश आलें नाहीं. तेव्हां श्री. बलसारा ह्यांना पुन्हां नोकरीवरून काढण्यांत आलें. तर्शी त्यांनीं युनायटेड नेशन्सच्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ट्रायब्यूनलकडे अपील केलें. पॅरीस विद्यापीठाच्या 'आंतरराष्ट्रीय कायदा शाखे'च्या प्रमुख मादाम बॅस्टिड, ह्या ट्रायब्यूनलच्या अध्यक्ष होत्या आणि लंडनच्या नॅशनल डॉक बोर्डाचे चेअरमन लॉर्ड कुक, स्वीडनच्या परराष्ट्रीय खात्यांतील कायदा शाखेचे प्रमुख मि. पेट्रेन व श्री. वेंकटरामन् हे बोर्डाचे इतर सभासद होते. ट्रायब्यूनलनें २२ ऑगस्ट रोजीं आपला निवाडा दिला. "श्री. बलसारा ह्यांना फक्त एकाच ठिकाणीं–फिलिपाइन्समध्यें–नोकरी मिळवून देण्याचा युनायटेड नेशन्सच्या मध्यवर्ती कचेरीनें प्रयत्न केला; अधिक खटपट केली नाहीं; ह्याचा अर्थ मध्यवर्ती कचेरीनें आपलें कर्तव्य योग्य रीतीनें पार पाडलें नाहीं" असा अभिप्राय ट्रायब्यूनलनें व्यक्त करून श्री. बलसारा ह्यांना एका वर्षाचा पगार ( सुमारें १०,००० डॉलर ) नुकसान-भरपाईदाखल देववला. त्यांचें इतरहि नुकसान भरून देण्यांत यावें असें ट्रायब्यूनलनें ठरविलें. युनायटेड नेशन्सच्या विरुद्ध ट्रायब्यूनलचा निवाडा होणें ही क्वचित घडणारी गोष्ट आहे, ह्यादृष्टीनें श्री. बलसारा ह्यांच्या विजयाचें विशेष महत्त्व आहे.

---

### सुप्रीम कोर्टाच्या सुट्टींत कपात

सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधिशांनीं आपण होऊन आपली सुट्टी कमी केली आहे. उन्हाळ्याची सुट्टी साडे–तीन महिन्यांची असते, ती त्यांनीं यंदा तीन महिनेच घेतली आणि २६ ऑगस्टपासून कामास सुरवात केली.

---

### सरकारी जाहिरातीचा खर्च

भारत सरकारनें १९५६–५७ मध्यें वृत्तपत्रांतील जाहिरातींवर ३१,००,०२७ रुपये एवढा खर्च केला.

## मुंबई सावकारीचा कायदा

[ ( १९५६ ) ५८ मुंबई लॉ रिपोर्टर १०३७ ]

मुंबई सावकारीच्या कायद्याच्या क. २५ ( १ ) मध्यें दिलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त दरानें व्याज घेणें किंवा आकारणें हा क. २५ ( ३ ) आणि ३४ खाली गुन्हा आहे. ऋणकोला कर्ज देतेवेळीं क. २५ ( १ ) मध्यें दिलेल्या दरापेक्षा जास्त दरानें व्याज देईन असा करार सावकारानें ऋणकोकडून करवून घेतला तर तो सावकार कलम २५ ( ३ ) आणि ३४ खाली दोषी ठरूं शकेल.

नागराज वालचंद रांका या सावकारानें तीन निरनिराळ्या तारखांना कैकादीन तुळसाबाई व्यंकू या बाईला अनुक्रमें ७५ रुपये, १५ रुपये आणि ५ रुपये या रकमा कर्जाऊ दिल्या. या रकमा कर्जाऊ देतेवेळीं सावकारानें त्या बाईकडून असा करार करवून घेतला कीं, मुंबई सावकारीच्या कायद्याच्या क. २५ ( १ ) मध्यें दिलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त दरानें ती व्याज देईल. पहिल्या दोन रकमांना तिनें दरसाल दर शेंकडा २० रुपये आणि शेवटच्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ८० रुपये याप्रमाणें व्याज देण्याचें कबूल केलें. कलम २५ ( १ ) खाली काढलेल्या नोटिफिकेशनमध्यें सरकारनें तारण असलेल्या कर्जावर दरसाल दर शेंकडा १२ रुपये याप्रमाणें व्याजाचा दर ठरवून टाकला होता. यावरून असें दिसून येईल कीं, या नोटिफिकेशनमध्यें दिलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त दरानें व्याज घेण्याचा करार सावकारानें कैकादीन तुळसाबाईकडून करवून घेतला.

कलम २५ ( १ ) मध्यें दिलेल्या दरापेक्षा जास्त दरानें व्याज घेण्याचा करार केल्यावरून नागराज वालचंद रांका या सावकारावर मुंबई सावकारीच्या कायद्याच्या क. २५ ( ३ ) आणि ३४ खाली खटला भरण्यांत आला.

कलम २५ ( १ ) मध्यें दिलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त व्याजाचा दर घेण्याचा करार केला एवढ्यावरूनच सावकार क. २५ ( ३ ) खाली दोषी ठरूं शकत नाहीं. त्यानें त्या दरानें तें व्याज प्रत्यक्ष घेतलें तरच तो क. २५ ( ३ ) खाली दोषी ठरूं शकतो असा निकाल देऊन मॅजिस्ट्रेटनें नागराज वालचंद रांकाला निर्दोष म्हणून सोडून दिलें; कारण त्यानें त्या जास्त दरानें प्रत्यक्ष व्याज घेतलें नव्हतें. त्या दरानें व्याज घेण्याचा केवळ करार केला होता. या निकालाविरुद्ध मुंबई सरकारनें हायकोर्टांत अपील केलें.

मुंबई सावकारीच्या कायद्याच्या क. २५ ( १ ) खाली वेळोवेळीं गॅझेटमध्यें नोटिफिकेशन देऊन विशिष्ट क्षेत्रापुरता जास्तींत जास्त व्याजाचा दर ठरविण्याचा अधिकार सरकारला दिलेला आहे. या नोटिफिकेशनप्रमाणें तारण असलेल्या कर्जावर दरसाल दर शेंकडा ९ रुपये आणि तारण नसलेल्या कर्जावर दरसाल दर शेंकडा १२ रुपये याप्रमाणें व्याजाचा दर ठरविण्यांत आला आहे. क. २५ ( १ ) खाली ठरलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त दरानें व्याज देण्याचा सावकार आणि ऋणको यांचेमधील करार क. २५ ( २ ) नें बेकायदा ठरविलेला आहे. कलम २५ ( ३ ) मध्यें असें म्हटलें आहे कीं, कलम २५ ( १ ) मध्यें दिलेल्या दरापेक्षा जास्त दरानें जर सावकार व्याज आकारील किंवा घेईल तर क. ३४ खाली मुंबई सावकारीच्या कायद्याचा त्यानें भंग केला असें समजलें जाईल. कलम २५ ( ३ ) चा भंग करणाऱ्या सावकाराला क. ३४ मध्यें शिक्षा सांगितली आहे.

कलम २५ ( १ ) मध्यें दिलेल्या दरापेक्षा जास्त दरानें


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेच्या नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

सावकारानें जर प्रत्यक्ष व्याज घेतलें तर त्यानें क. २५ ( ३ ) चा भंग केला असें समजलें जाईल याबद्दल वाद नाहीं. प्रश्न असा आहे कीं, ऋणकोला कर्ज देतेवेळीं क. २५ ( १ ) मध्यें दिलेल्या दरापेक्षा जास्त दरानें व्याज देईन असा करार जर सावकारानें ऋणकोकडून करवून घेतला तर त्यानें क. २५ ( ३ ) चा भंग केला असें समजतां येईल काय ?

हायकोर्टांत सावकारातर्फे असा युक्तिवाद करण्यांत आला कीं, क. २५ ( ३ ) मध्यें "आकारणें" हा जो शब्दप्रयोग आहे त्याचा अर्थ अमुक एक मुदतीचें जें कांहीं व्याज झालें असेल तें ऋणकोकडून घेणें. प्रस्तुत केसमध्यें ऋणकोला कर्ज देतेवेळीं क. २५ ( १ ) मध्यें दिलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्त दरानें व्याज देईन असा करार सावकारानें ऋणकोकडून करवून घेतला होता. असें करणें म्हणजे व्याज 'आकारणें' नव्हे असें सावकाराच्या वकिलाचे म्हणणें होतें.

हा युक्तिवाद हायकोर्टानें मान्य केला नाहीं. कलम २५ ( ३ ) खालीं जास्त दरानें व्याज घेणें बेकायदा ठरविलें आहे; एवढेंच नव्हे तर जास्त दरानें व्याज आकारणें बेकायदा ठरविलें आहे. अमुक एका मुदतीच्या व्याजाचा हिशेब करून तो हिशेबाच्या वहींत ऋणकोकडून येणें आहे असें लिहिलें तरच तो दर आकारण्यांत आला असें म्हणतां येईल असें नसून ऋणकोला कर्ज देतेवेळीं क. २५ ( १ ) मध्यें दिलेल्या दरापेक्षा जास्त दरानें व्याज देईन असा करार जर सावकारानें ऋणकोकडून करवून घेतला तर सावकारानें त्या दरानें व्याज आकारलें असें म्हणतां येईल. असें करणें क. २५ ( ३ ) च्या विरुद्ध असल्यामुळें सावकार क. २५ ( ३ ) आणि ३४ खालीं दोषी ठरून शिक्षेस पात्र होईल, असा निकाल हायकोर्टानें दिला.

प्रस्तुत केसमध्यें सावकार क. २५ ( ३ ) आणि ३४ खालीं दोषी आहे असा निकाल देऊन हायकोर्टानें त्याला ५० रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली आणि सरकारी अपील मंजूर केलें.

---

### टाटा कंपनीचा सुवर्णमहोत्सव

गेल्या आठवड्यांत, २६ ऑगस्ट, १९५७ रोजीं, टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि. ला ५० वर्षे पुरीं झालीं. श्री. जमशेटजी नसरवानजी टाटा ह्यांनीं योजल्याप्रमाणें कंपनी सुरू झाली, त्यावेळीं तिचे कल्पक उत्पादक दुर्दैवानें हयात नव्हते. त्यांच्या मृत्यूनंतर तीन वर्षांनीं कंपनीस प्रारंभ झाला; परंतु त्याचें सर्व श्रेय अर्थातच श्री. जमशेटजी टाटा ह्यांनाच आहे. कंपनीला तीनच आठवड्यांत ८,००० लोकांनीं मिळून २ कोटी रु. भांडवल दिलें. साकची ह्या लहानशा खेड्यांत लवकरच पोलादाचा मोठा कारखाना उभा राहिला आणि त्या खेड्याचें मोठ्या आधुनिक शहरांत—जमशेडपूरमध्यें—रूपांतर झालें. ह्या कारखान्यानें आतांपर्यंत २,२०,००,००० टन पोलादाचें उत्पादन केलें आहे. कारखान्याची उत्पादनक्षमता दुप्पट करण्याच्या दृष्टीनें सध्या काम चालू आहे.

---


# ४। टक्के दराचे
# मुंबई राज्य विकासकर्ज १९६९
## १०० च्या रोख्याची विक्रीची किंमत रु. ९९·७५
## ता. १६ सप्टेंबर १९५७ रोजीं विक्रीस सुरुवात

अदमासें ६०० लाख रुपये किंमतीचे कर्जरोखे खपल्याबरोबर विक्री थांबविण्यांत येईल आणि कोणत्याहि परिस्थितींत १८ सप्टेंबर १९५७ रोजीं कामकाजाची वेळ संपल्यानंतर विक्री चालू ठेवण्यांत येणार नाहीं.

कर्जरोख्यांच्या मागणीचे अर्ज खालील ठिकाणीं स्वीकारण्यांत येतील......

( अ ) बंगलोर, मुंबई, कलकत्ता, मद्रास, नागपूर व नवी दिल्ली येथील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या कचेऱ्या.

( ब ) खाली (क) मध्यें दर्शविलेल्या शहराव्यतिरिक्त मुंबई राज्यांतील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखा कचेऱ्या.

( क ) मुंबई राज्यांतील स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या शाखा व ट्रेझरी पे-ऑफिसेस.

( ड ) मुंबई राज्यांतील जेथें उपरीनिर्दिष्ट बँकेच्या शाखा अगर ट्रेझरी पे-ऑफिस नाहींत अशा ठिकाणच्या गव्हर्मेंट ट्रेझरीज् व सब ट्रेझरीज्.

( इ ) स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र भावनगर व मुंबई राज्यांतील सौराष्ट्र विभागांतील सदर बँकेच्या शाखा—कचेऱ्यांतहि अर्ज स्वीकारण्यांत येतील व ते जवळच्या अर्ज स्वीकारण्याच्या ठिकाणीं पाठविण्यांत येतील.

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि., पुणें शहर
## १९५६-५७ चें, ४० वें वार्षिक इतिवृत्त

या वर्षी बँकेचा व्यवहार १४ शाखा व उपशाखा यांचेमार्फत चालू होता. बँकेस जोडलेल्या सहकारी सोसायटयांची संख्या वर्ष-अखेरीस ८४३ होती. गतवर्षी ती ८२१ होती.

गेल्या तीन वर्षांचे शेती-कर्जाचे येणें-बाकीचे आंकडे माहितीसाठी खाली दिले आहेत.

३०-६-५५ अखेर ... रु. ६७,४४,८५७
३०-६-५६ „ ... रु. ७४,७४,८९०
३०-६-५७ „ ... रु. ८७,३८,२११

या रकमेपैकी थकबाकी रु. १६,१०,०१९ असून येणेंबाकीशीं या थकबाकीचें प्रमाण १८.२ टक्के एवढें आहे. सन १९५६-५७ मध्यें शेती-कर्जातील एकूण वसूल रु. ५८,३१,५८६ असून तो गतवर्षीपेक्षा रु. १७,७४,२३० नें जास्त आहे.

गेलीं पांच वर्षें सातत्यानें चालू असलेली बटाटा कर्ज-योजना अहवालाचे सालींहि चालू होती. यंदाहि एकरीं रु. ६०० प्रमाणेंच कर्ज मंजूर करण्यांत आलें. कर्जवाटप मालाचे रूपानेंच झालें. या योजनेचा यंदाचा तपशील येणेंप्रमाणें आहे.

| सोसायटयांची संख्या | सभासद संख्या | क्षेत्र एकर | मंजूर रकम |
|---|---|---|---|
| १०७ | २६३६ | २८३० | रु. १६,९७,९९५ |

बटाटयाच्या भागांत या वर्षी विहिरींना भरपूर पाणी असल्यामुळें गुदस्तापेक्षा यंदा मागणी जास्त प्रमाणांत आली.

मध्यम मुदत कर्ज— ३०-६-५६ ची बाकी रु. १,८०,८१६
चालू वर्षांतील—मंजूर रु. १,००,६४५
वसूल रु. १,१०,४७६
३०-६-५७ ची येणें बाकी— रु. १,५६,५२० पैकी
थकबाकी— रु. २,०५४.

बँकेच्या कार्यक्षेत्रांतील माळेगांव व सणसर या दोन सहकारी साखर कारखान्यांपैकी सणसर कारखान्यानें या वर्षी साखर तयार करण्यास सुरुवात केली. या कारखान्यांपैकी माळेगांव कारखान्याची उत्पादनक्षमता रोजीं १००० ते १२५० टन आहे, तर सणसरची ५०० ते ६०० टन आहे. साखर कारखाना सुरू होणेंस आवश्यक अशी यंत्रसामुग्री मिळण्यांत अपरिहार्य अडचणी आल्यानें माळेगांव साखर कारखाना या मोसमांत सुरू करतां येऊं शकला नाहीं. सणसर कारखान्यानें मात्र दि. १७-१-५७ पासून २०-४-५७ अखेर एकूण ४४,१३८ पोतीं साखर तयार केली. या उत्पादनाची रोजची सरासरी ४६० पोतीं पडली. या कारखान्यानें गाळलेल्या उसापैकी सभासदांचा ऊंस ३१,०५५ टन होता तर बिगर-सभासदांचा ६,०२२ टन होता. सभासदांच्या उसास टनीं ४३ रुपये भाव मिळाला. माळेगांव साखर कारखाना येत्या मोसमांत सुरू होईल अशी अपेक्षा आहे. या कारखान्यांमुळें बारामती भागांतील वसुलाची निश्चिति झाली आहे.

पुणें जिल्ह्यांतील बटाटा व ऊंस हीं दोनच पिकें अर्थोत्पादक म्हणून, आजपावेतों महत्त्वाचीं मानलीं जात होतीं. आतां मुंबई राज्य सरकारनें सुरू केलेल्या जपानी पद्धतीच्या भातशेतीच्या (पायलट स्कीम फॉर इन्टेन्सिव्ह कल्टिव्हेशन इन् पॅडी एरिया) योजनेमुळें भातपिकास यंदापासून महत्त्व येऊं लागेल. मुंबई राज्यांतील एकूण एक लाख एकर जमीन या योजनेखाली आणण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. राज्यांतील पांच जिल्ह्यांतील भातशेती प्रधान अशा पांच गटपैकी एक गट (मावळ-मुळशी-भोर) आपल्या जिल्ह्याच्या वांट्यास आला आहे. आपल्या राज्याचें महसूल खातें, शेतकी खातें, सहकारी खातें आणि मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या सहकार्यानें ही योजना प्रत्यक्षांत येत आहे. जपानी पद्धतीच्या परिमाणाप्रमाणें आवश्यक तें बियाणें, खत, पेंड आणि मशागतीच्या काळांत खावटीसाठी कांहीं रोख रकम शेतकऱ्यांस पुरविणें हा या योजनेचा प्रमुख भाग आहे.

ही योजना कार्यवाहींत आणण्यासाठी बँकेनें सर्व प्रकारचें सहकार्य दिलें आहे. या योजनेखाली पिकणारें भात कर्जदार शेतकऱ्यांनीं प्रथम सरकारी गुदामांत द्यावयाचें आहे. यामुळें वसूल सुलभतेनें होण्यास मदत होईल. या योजनेखालील मंजूर कर्जाचा तपशील येणेंप्रमाणें आहे.

| सोसायटया | सभासद | एकर भातशेती | मंजूर रकम |
|---|---|---|---|
| ३६ | ३,४४८ | ४,३५५ | रु. २,८०,३०० |

रद्द सोसायटयांकडील येणें ३०-६-५७अखेर रु.३,११,२३०-२९ एवढें आहे. गतवर्षीपेक्षा यामध्यें वाढ होण्याचें कारण म्हणजे (१) बारामती वि. का. स. सोसायटी (२) जुन्नर तालुका विणकर सह. संघ, या दोन सोसायटया लिक्विडेशनमध्यें गेल्या. रद्द तारखेस त्यांचेकडून अनुक्रमें रु. १,२७,९८६-९६ व १३,४९९-२८ एवढी बाकी येणें होती.

घरगुती व ग्रामीण उद्योगधंद्यांना विशेष उत्तेजन देण्याचें सरकारी धोरण आहे. या धोरणानुसार बँकेमार्फत औद्योगिक सोसायटयांना कर्जपुरवठा करण्यासाठी अहवालाचे सालीं दहा वर्षांचे मुदतीनें द. सा. द. शें. अर्धा टक्का दरानें सरकारनें बँकेस रु. ५०,००० दिले आहेत. यांतून सहा सोसायटयांना रु. ३०,६०० रकम मंजूर केली आहे. विणकर सहकारी सोसायट्यांसाठी चालू वर्षांत सरकारकडून रु. ४५,००० दहा वर्षांचे मुदतीनें बँकेस बिनव्याजी मिळाले आहेत. त्यांपैकीं एकूण दोन सोसायटयांना रु. १२,००० कर्ज मंजूर करण्यांत आलेलें आहे.

गतवर्षी बँकेचें सर्व भागभांडवल खपल्यानें बँकेनें तें पांच लाखांनीं वाढविलें. या वाढीस मा. रजिस्ट्रार यांची मंजुरी मिळालेली आहे. त्याचप्रमाणें मुंबई राज्य सहकारी बँकेनेंहि उरलेल्या चार लाखांचे भाग घेतले आहेत. बँकेचें वसूल भागभांडवल आतां रु. १५.६२ लाख आहे.

या सालीं बँकेस निव्वळ नफा रु. १,७५,६७७.३३ झाला आहे. त्याची पुढीलप्रमाणें वांटणी करावी अशी संचालक मंडळाची शिफारस आहे.

| | | रुपये नये पैसे |
|---|---|---|
| गंगाजळी | ... | ४४,३०१.८० |
| बुडीत व संशयित कर्ज | ... | १०,०००.०० |
| नफा वांटप ६% प्रमाणें | ... | ७०,०००,०० |
| शाखा इमारत | ... | २५,०३२,०० |
| बोनस | ... | १५,०००,०० |
| ग्रॅच्युइटी | ... | ६,३३०-२३ |
| शिक्षण निधि | ... | २,६३५-२५ |
| महोत्सव निधि | ... | २,०००.०० |
| प्रचार निधि | ... | ३७८.०५ |
| एकूण | | रु. १,७५,६७७.३३ |

# मुंबई राज्यांतील सहकारी चळवळ

## (२)

### ग्रामीण कर्जपुरवठा

ग्रामीण भागांतील सामाजिक जीवन सुधारण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे ग्रामीण भागांत कर्जपुरवठा करण्याची सोय करणें हा होय. ग्रामीण भागांत, सर्वोच्च बँक, सेंट्रल बँक व प्राथमिक संस्था आणि प्रांतिक लँड मॉर्गेज बँक व प्राथमिक लँड मॉर्गेज बँक या संस्थांमार्फत कर्जे पुरविण्यांत येतें. सध्यां ४७ मध्यवर्ती सहकारी बँका तसेंच तीन सर्वोच्च सहकारी बँका अस्तित्वांत आहेत. सध्यां २०,००० शेतकी पतपेढ्या असून त्यांची सभासदसंख्या १८ लक्ष इतकी आहे. या संस्था शेतकऱ्यांना अल्पमुदतींचें कर्ज पुरवितात. या संस्थांनीं ८० टक्के गांवें व २९ टक्के लोकसंख्या व्यापलेली आहे. १९५६–५७ सालीं, अशा २८० संस्था रजिस्टर करण्यांत आल्या असून सरकारनें निरनिराळ्या पतपेढ्यांना शेअर भांडवलासाठी ५५·८६ लक्ष रुपये दिले आहेत.

### शेतकी उत्पादन

शेतकी उत्पादनाला उत्तेजन देण्यासाठी अधिक कर्जपुरवठा करण्याबाबत उपाययोजना करण्यांत येत असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत सहकारी संस्थांमार्फत ६१·६० कोटी रुपये इतक्या कर्जाची तरतूद करण्याचा विचार आहे. या संस्थांमार्फत सध्यांच्या मुंबई राज्याच्या २२४ लक्ष लोकांना अल्प मुदतीचें, मध्यम मुदतीचें आणि दीर्घ मुदतीचें कर्ज पुरविण्यांत येईल.

शेतकी-उत्पादनाच्या क्षेत्रांत ३४९ शेती-संस्था असून त्यांची सभासदसंख्या १२,६९४; शेअर भांडवल १२·१९ लक्ष रुपये आणि खेळतें भांडवल ६४·३२ लक्ष रुपये आहे. १९५६–५७ सालीं अशा १४ संस्था रजिस्टर करण्यांत आल्या. २३ संस्थांना १८,२,४०० रुपयांचीं कर्जे आणि ४३ संस्थांना १३,८,५९२ रुपयांची आर्थिक मदत देण्यांत आली आणि सहा सहकारी शेती-संस्थांना त्यांच्या शेअर भांडवलासाठी १,६,९०० रुपये मंजूर करण्यांत आले.

तसेंच, तीन सहकारी लिफ्ट इरिगेशन संस्था स्थापन झाल्या. सध्यां २८९ सहकारी लिफ्ट इरिगेशन योजना अस्तित्वांत असून त्यांच्याद्वारां ६४,२६८ एकर एवढ्या जमिनीला पाणी पुरविण्यांत येतें. २८० योजना पुऱ्या झाल्या असून त्याच्याद्वारें ३७,१३५ एकर जमिनीला पाणी पुरविण्यांत येतें.

### दूध-संस्था

मुंबई, अहमदाबाद आणि पुणें अशा मोठ्या शहरांतून सरकारी अगर सहकारी दूध-योजना चालू आहेत. या शहरांतून सहकारी संस्थांकडून अगर परस्पर दूध-उत्पादकांकडून दूध जमा केलें जातें. या शहरांतून सरकार व सहकारी संस्था यांच्या दरम्यान संबंध राखण्यासाठी दूध-उत्पादकांचें फेडरेशन स्थापन करण्याचा विचार आहे. सरकारला पुरवावयाच्या दुधाचा दर्जा सुधारण्यासंबंधीं हें फेडरेशन दूध-उत्पादकांच्या संस्थांना सल्ला देईल. जेथें फेडरेशन अगर सरकारी दूध-योजना अस्तित्वांत नाहींत अशा गांवांतून सहकारी दूध-संघ स्थापन करण्याबाबत उपाययोजना करण्यांत येत आहेत. या संघांना कमींत कमी पांच दूध-उत्पादकांच्या संस्था संलग्न करण्यांत येतील. या संस्था शेतकऱ्याला योग्य अशा पैदाशीच्या पद्धतींची ओळख करून देऊन दुधाचें उत्पादन वाढविण्याच्या बाबतींत साहाय्य करतील.

# शेतमालासाठी गुदामें

## राज्य कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत येणार

एक वेअरहौसिंग (गुदामें) कॉर्पोरेशन स्थापन करण्याचा मुंबई सरकारचा विचार असून सदरहू कॉर्पोरेशनचें सुरवातीचें भरणा झालेलें भाग भांडवल १४ लाख रुपयांचें राहील. या भाग भांडवलापैकी निम्में भांडवल मध्यवर्ती वेअर हौसिंग कॉर्पोरेशन देईल व उरलेलें निम्में भांडवल राज्य सरकार देईल.

या कॉर्पोरेशनचें नांव मुंबई राज्य वेअरहौसिंग कॉर्पोरेशन असें राहील, व छोट्या विक्रीकेंद्राचे ठिकाणीं गुदामें बांधण्याचें काम या कॉर्पोरेशनकडे सोंपविण्यांत येईल. व्यापारी दृष्टीनें महत्त्वाच्या अशा केंद्राचे ठिकाणीं गुदामें बांधण्याचें काम मध्यवर्ती वेअरहौसिंग कॉर्पोरेशन करील. सदरहू योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत आली असून त्यासाठीं योजनेच्या काळांत एकूण ६५,६४,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

शेतमालाच्या उत्पादकांना शेतमालाचा संग्रह करतां यावा, त्यांना सुलभतेनें कर्जें मिळावीं आणि आर्थिक गरजेच्या वेळीं अडचणींत सांपडून त्यांनीं आपला माल विकूं नये म्हणून राज्य वेअरहौसिंग कॉर्पोरेशनांच्या मार्फत महत्त्वाच्या ठिकाणीं गुदामें बांधण्यांत यावीं अशी शिफारस अखिल भारतीय ग्रामीण कर्ज-पुरवठा समितीनें केली होती.

राज्य वेअरहौसिंग कॉर्पोरेशनचे उद्देश पुढीलप्रमाणें आहेत:–

(१) सोयीस्कर अशा ठिकाणीं गुदामें बांधणें व ताब्यांत घेणें (२) व्यक्ति आणि सहकारी संस्था यांचा शेतमाल, बीं-बियाणीं, खतें, रासायनिक खतें आणि शेतकीचीं अवजारें साठवून ठेवण्यासाठी गुदामें चालविणें, आणि (३) शेतमालांची गुदामांकडे व गुदामांतून ने-आण करण्यासाठी वाहतुकीची व्यवस्था करणें.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत मध्यवर्ती कॉर्पोरेशनचीं सुमारें २० आणि राज्य कॉर्पोरेशनचीं ६० गुदामें बांधण्याचा विचार आहे. ह्या गुदामांना वेअरहौसेस कायद्याखालीं लायसेन्सें देण्यांत येतील आणि त्यांचे मार्फत शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठीं सुलभरीत्या कर्जें मिळण्याची सोय होईल.

कॉर्पोरेशच्या डायरेक्टर मंडळामध्यें मॅनेजिंग डायरेक्टरसह एकूण ११ डायरेक्टर असतील. पांच डायरेक्टरांची नेमणूक मध्यवर्ती कॉर्पोरेशन करील. यापैकी एकाची नेमणूक स्टेट बँकेच्या सल्ल्यानें करण्यांत येईल व किमान एक डायरेक्टर बिन-सरकारी असेल. उरलेल्या पांच डायरेक्टरांची नेमणूक राज्य सरकार करील. यापैकी दोन डायरेक्टर बिनसरकारी व तीन सरकारी असतील. हे तीन डायरेक्टर पुढीलप्रमाणें, मुंबई सरकारचे उद्योगधंदे आणि सहकार खात्याचे सेक्रेटरी, मुंबई राज्याचे डायरेक्टर ऑफ अग्रिकल्चर आणि मुंबई राज्याचे रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज. मॅनेजिंग डायरेक्टरांची नेमणूक इतर १० डायरेक्टरांच्या सल्ल्यानें मध्यवर्ती कॉर्पोरेशनच्या पूर्व-मान्यतेनें राज्य सरकार करील.

---

### नव्या आगाखानांचें पहिलें पौरोहित्य

२० वर्षे वयाच्या नव्या आगाखानांनीं लंडन येथें विवाहाचें पौरोहित्य २४ ऑगस्ट रोजीं प्रथमच केलें. वर २८ वर्षांचा होता व वधू २६ वर्षांची होती.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.